महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,कोल्हापूर विभागीय मंडळ ,कोल्हापूर.

क्र.कोविमं/शाखा जे-२/गोप.
दिनांक :- २४ /०८/२०१८

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

विषय :- उच्च माध्यमिक (इ.१२ वी) प्रमाणपत्र परीक्षा उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन करणेबाबत.
संदर्भ :- शासनाचे क्र.एस्एस्सी-२०१२ /प्र.क्र.(२७३) /१२/उमाशि-२ दि.२९.१२.१२ चे आदेश.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, फेब्रुवारी/मार्च २०१३ च्या परीक्षेपासून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांनी या विभागीय मंडळाकडून निकालानंतर उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकनाची मागणी केल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेच्या ऑनलाईन निकालांनतर कमाल सहा विषयांच्या उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन पुनर्मुल्यांकन करुन देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर बाब आपल्या मार्फत सर्व संबंधित विद्यार्थी /शिक्षक / पालक यांचे निदर्शनास आणावी.

**✧ पुनर्मुल्यांकनासाठी अवलंबण्यात येणारी कार्यपध्दती खालील प्रमाणे आहे. ✧**

**१) फक्त उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी करणारे विद्यार्थीच पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज करु शकतील.**

२) पुनर्मुल्यांकनासाठी विद्यार्थ्याने स्वहस्ताक्षरात अर्ज करणे आवश्यक राहील.

३) यासाठी प्रती विषय रु ३००/- (रु.तीनशे फक्त)शुल्क मंडळाकडे रोखीने अथवा चलनाव्दारे जमा करावे लागेल.

४) पुनर्मुल्यांकनासाठी सहा विषयासाठी अर्ज करता येईल.

५)या विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळाल्यानंतर पाच दिवसाच्या आत मंडळाकडे विहीत नमुन्यात आपल्या शाळेतील / क.महाविद्यालयातील विषय शिक्षकाकडून उत्तरपत्रिकेची छायाप्रत तपासून घेवून त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अर्ज करणे आवश्यक राहील.

६) विद्यार्थी केवळ लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मुल्यांकनासाठी मागणी करु शकतील. ऑनलाईन व्दारे दिलेली परीक्षा माहिती तंत्रज्ञान विषयाच्या, तसेच तोंडी ,प्रात्यक्षिक,अंतर्गत मूल्यमापन व प्रकल्पलेखन किंवा तत्सम उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्याची मागणी करता येणार नाही.तसेच विषयाच्या एका भागाचे उत्तरपत्रिकेच्या पुनर्मुल्यांकन करण्याची मागणी करता येणार नाही.

७) इ.१० वी व इ.१२ वी च्या परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ झाले आहेत त्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या उत्तरपत्रिकेबाबत संपर्क केंद्रावरील/आवेदनपत्र सादर केलेल्या शाळा/क.महाविद्यालयातील विषय शिक्षकांकडून अभिप्राय घेवून अर्जासोबत सादर करावेत.

८) विद्यार्थ्यांना उ.प.पुनर्मुल्यांकन अर्जाचा नमुना मंडळाच्या संकेतस्थळावरुन सुध्दा उपलब्ध होवू शकेल. संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्यात येणाऱ्या अर्जाचे शुल्क (रु.१०/-) संबंधित विद्यार्थ्यास पुनर्मुल्यांकनाच्या शुल्कासोबत मंडळाकडे जमा करावे लागेल.

९) परिपूर्ण भरलेला अर्ज विद्यार्थ्यास किंवा त्याच्या प्रतिनिधीमार्फत मंडळाकडे समक्ष हस्तपोच स.१०.३० ते दु.३.०० या वेळेत सादर करता येतील . कोणत्याही परिस्थितीत पोष्टाव्दारे प्राप्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. पुनर्मुल्यांकनाचे शुल्क रोख अथवा चलनाव्दारेच स्विकारले जाईल.

१०) उत्तरपत्रिकेची पुनर्मुल्यांकनाची कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात येईल.

अ) वस्तुनिष्ठ प्रश्न ( १ किंवा अर्ध्या गुणांचे प्रश्न .उदा:- रिकाम्या जागा , जोड्या लावा, योग्य पर्याय निवडा, चुक किंवा बरोबर लिहा इ. प्रकारचे प्रश्न) पुर्णपणे तपासले जावून त्यामध्ये होणारी गुणांची वाढ किंवा घट जशीच्या तशी ग्राह्य धरण्यात येईल.

ब) इतर सर्व दिर्घोत्तरी प्रश्नाच्या गुणात बदल होणाऱ्या उत्तराबाबतचा निर्णय समितीमध्ये बहुमताने मान्य होणे आवश्यक आहे. समान संख्येच्या मतांच्या बाबतीत मुख्य नियामक/समिती प्रमुख यांचा निर्णय अंतिम राहील. त्यामधील वाढ/घट ग्राह्य धरण्यात येवून असे बदल हे त्याने त्या विषयात अशा प्रश्नांसाठी पूर्वी मिळविलेल्या गुणाच्या (दिर्घोत्तरी प्रश्नाच्या मूळ गुणांच्या) किमान ५ टक्के कमी किंवा जास्त असतील तरच सुधारित गुण ग्राह्य धरण्याचा निर्णय हा विहीत पध्दतीने विभागीय अध्यक्षाच्या मान्यतेने निर्णय अमंलात आणून विद्यार्थ्यांस बदल अथवा नों चेंज कळविण्यात येईल.

मात्र ज्या विषयास लेखी परीक्षेत ९० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त झालेले आहेत अशा विषयाच्या पुनर्मुल्यांकनात गुण वाढ मंजुर करण्यासाठी किमान ५ टक्के गुणवाढीची अट शिथिल करुन जितके गुण वाढतील ते विद्यार्थ्यांस देण्यात येतील.

११) पुनर्मुल्यांकनामध्ये विद्यार्थ्याच्या गुणात बदल झाल्यास तसे संबंधित विद्यार्थ्यास व शाळा/क.महाविद्यालयास कळविण्यात येईल. त्यानुसार संबंधित विद्यार्थ्याने आपले मूळ गुणपत्रक विभागीय मंडळाकडे जमा करावे. त्यानंतरच त्यास सुधारित गुणपत्रक विभागीय मंडळाकडून विनामूल्य देण्यात येईल.

१२) गुणात बदल झालेल्या प्रकरणाबाबत फक्त पुनर्मुल्यांकनासाठी आकारलेले शुल्क परत दिले जाईल.

१३) उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन केल्यानंतर त्यावर होणारा निर्णय अंतिम राहील व तो विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील. त्यानुसार पुनर्मुल्यांकनानंतर संबंधित विद्यार्थ्याची मूळ संपादणूक आपोआप रद्द होवून सुधारित संपादणूक विद्यार्थ्यास स्विकारावी लागेल.

१४) अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुनर्मुल्यांकनानंतर त्याच्या मूळ निकालात बदल होत नसल्यास तसेच विषयात उत्तीर्ण होत नसल्यास ५ टक्के पर्यतचा गुण बदल प्रकरणी त्याचा मूळ निकाल कायम ठेवण्यात येवून त्यास 'नो चेंज' असे कळविले जाईल.

१५) एकदा उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन केल्यानंतर त्याच उत्तरपत्रिकेच्या पुन:श्च गुणपडताळणी, पुनर्मुल्यांकन किंवा छायांकित प्रतींची मागणी करता येणार नाही.

१६) पुनर्मुल्यांकन संदर्भातील तक्रार निवारण पध्दती ही निकालात सुधार होण्यासाठी विद्यार्थ्यास उपलब्ध करुन देण्यात आलेली अतिरिक्त सुविधा असल्यामुळे यानुसार कार्यवाही करीत असताना निकाल जाहीर होण्यास विलंब झाल्यास त्यामुळे होणाऱ्या संभाव्य परिणामास/शैक्षणिक नुकसानीस मंडळ जबाबदार असणार नाही.

१७) पुनर्मुल्यांकन केलेल्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत विद्यार्थ्यास दिली जाणार नाही किंवा माहिती अधिकारातही उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी विद्यार्थ्यास करता येणार नाही.

१८) उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळणेबाबत भरलेले शुल्क विद्यार्थ्यास कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

१९) दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यालाही उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीसाठी व पुनर्मुल्यांकनासाठी विहित शुल्क भरावे लागेल.

विद्यार्थ्यास उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळाल्यानंतर पाच दिवसाच्या आत मंडळाकडे पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज करणे आवश्यक आहे.त्यासाठी आपल्या शाळा/क.महाविद्यालमधील शिक्षकांनी ज्या विषयासाठी पुनर्मुल्यांकन करावयाचे आहे त्या विषयाच्या प्राप्त झालेल्या उत्तरपत्रिकेची (छायाप्रत) सूक्ष्म पध्दतीने, वस्तुनिष्ठपणे व मंडळाच्या नमुना उत्तरानुसारच पडताळणी करुन या पत्रासोबत अभिप्राय नमुना प्रपत्रामध्ये परीपूर्ण माहिती भरुन स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदवावेत.विषय शिक्षकांकडून प्राप्त झालेले अभिप्राय मंडळाच्या सक्षम समितीसमोर पुन्हा पडताळणीसाठी ठेवले जाणार आहेत ही बाब विषय शिक्षकांनी ध्यानी घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत अकारण वस्तुस्थितीच्या विरुध्द अभिप्राय नोंदवण्यात येवू नयेत. विद्यार्थ्यांना फोटोकॉपी मिळाल्यांनतर पुनर्मुल्यांकनाची मुदत केवळ पाच दिवसाची असल्याने शिक्षकांनी त्यानुसार मुदतीत अभिप्राय नोंदवून द्यावेत. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जावर मंडळाकडून कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

तरी उपरोक्त सर्व सूचना विद्यार्थी/विषय शिक्षक यांना अवगत कराव्यात व त्यानुसार कार्यवाही करावी

प्र. विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ ,कोल्हापूर.

सोबत:- १) अर्जाचा नमुना
२) विषय शिक्षकांचे अभिप्राय प्रपत्र नमुना .

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

परिपत्रक क्र.कोविमं/उमा. गोपनीय जे-२ दि. २४, ऑगस्ट २०१८

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र जुलै २०१८ परीक्षेच्या निकालानंतरच्या छायांकित प्रती व गुणपडताळणी संदर्भात महत्वाच्या सूचना**

१) छायांकित प्रती व गुणपडताळणी अर्ज मंडळाने दिलेल्या विहीत नमुन्यातच आवश्यक आहे.

२) छायांकित प्रती व गुणपडताळणी अर्जावर विद्यार्थ्याने स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

३) छायांकित प्रती व गुणपडताळणी अर्जासोबत मुळ गुणपत्रक मिळेपर्यंत ऑनलाईन निकालाच्या गुणपत्रकाची छायांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे.व मुळ गुणपत्रक मिळाल्यानंतर मुळ गुणपत्रकाची छायाप्रत जोडणे आवश्यक आहे.

४) छायांकित प्रती शुल्क प्रत्येक विषयासाठी रु.४००/- व गुणपडताळणी शुल्क प्रत्येक विषयासाठी रु.५०/- प्रमाणे आहे .

५) क.महाविद्यालय प्रमुखांनी विद्यार्थ्याकडून छायांकित प्रती मिळणेबाबतचा अर्ज व गुणपडताळणी अर्ज स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे असुन तद्नंतरचे छायांकित प्रती मिळणेबाबतचे अर्ज व गुणपडताळणी अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

६) कनिष्ठ महाविद्यालयांनी छायांकित प्रती मिळणेबाबतचे व गुणपडताळणीचे परिपूर्ण भरलेले अर्ज परस्पर मंडळाकडे न पाठविता अर्ज एकत्रित करून यापूर्वी पुरविलेल्या बँक ऑफ इंडीयाच्या चलनाद्वारे रक्कम भरणा करावी.(चलन रिसीट कोड नं. ०७ आहे.) व खालील तारखाप्रमाणे जिल्हा वितरण केंद्रावर जमा करावीत.

**७) <u>विभागीय मंडळाच्या कार्यालयात येऊन छायांकित प्रती व गुणपडताळणी अर्ज थेट मंडळाकडे करण्याची सुविधा उपलब्ध आहे.</u>**

**गुणपडताळणी अर्ज करण्याच्या तारखा व प्राप्त अर्ज कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी आपल्या जिल्ह्यातील संबंधीत वितरण केंद्रावर अर्ज संकलन करावयाच्या तारखा.**

| तपशील | क.म.प्रमुखांनी विद्यार्थ्याकडून अर्ज स्विकारण्याच्या तारखा | वितरण केंद्रावर अर्ज जमा करण्याच्या तारखा | वितरण केंद्रप्रमुखांनी मंडळ कार्यालयात अर्ज जमा करण्याच्या तारखा |
|---|---|---|---|
| गुणपडताळणी अर्ज | दि. २७ /०८/२०१८ ते दि.०५ /०९/२०१८ | दि. ०६/०९/२०१८ | दि. ०७ /०९/२०१८ |

**८) ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकांची छायाप्रत प्राप्त करावयाची आहे त्यांनी ऑनलाईन निकाल जाहीर झाल्यानंतर विहित नमुन्यात विहित शुल्कासह सोमवार दिनांक २७/०८/२०१८ ते शनिवार दिनांक १५/०९/२०१८ पर्यंत या विभागीय मंडळाकडे अर्ज करावयाचा आहे. अर्जासोबत ऑनलाईन निकालांची सांक्षाकित प्रत/गुणपत्रिकेची छायाप्रत जोडणे अनिवार्य राहील.**

१. **<u>फेब्रुवारी/मार्च २०१९ च्या परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी छायांकित प्रती/ गुणपडताळणीच्या निर्णयाची वाट न पाहता मंडळाने नियोजित केलेल्या तारखांना आवेदनपत्रे भरणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतंत्र तारीख दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी व विद्यार्थ्यांना तसे कळवावे.</u>**

२. क.महाविद्यालय प्रमुखांनी विद्यार्थ्यांचे गुणपडताळणीचे अर्ज पाठविताना विद्यार्थ्यांनी योग्य ती फी भरलेली आहे किंवा नाही हे तपासणे आवश्यक आहे. उच्च माध्य. प्रमाणपत्र परीक्षेच्या छायाकिंत प्रती व गुणपडताळणी नंतर गुणांमध्ये बदल झालेल्या गुणपत्रिका विद्यार्थ्यांनी मंडळाकडून गुण बदलाचे पत्र प्राप्त झाल्यापासून एक वर्षाच्या कालावधीत बदलून घ्याव्यात. या कालावधीनंतर गुणपत्रिका बदलून नेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रत्येक वर्षासाठी रु.१००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल.अशी गुणपत्रिका तीन वर्षापर्यंत बदलून दिली जाईल. तद्नंतर दंड भरुनही गुणपत्रिका बदलून देता येणार नाही. विद्यार्थ्याने क.महाविद्यालयाच्या पत्रासोबत मूळ गुणपत्रिका सादर केल्यानंतरच सुधारित गुणपत्रिका देण्यात येईल. **( <u>सोबत छायांकित प्रती व गुणपडताळणी अर्जाचा नमुना जोडला आहे.</u> )**

***<u>टीप : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या (इ.१२ वी) निकालानंतर ज्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत उत्तरपत्रिकेच्या छायाप्रती मिळणेबाबत विहित शुल्क भरून अर्ज केला आहे अशा प्रकरणात भरलेले शुल्क विद्यार्थ्यास कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही याची नोंद घेवून सदर बाब सर्व विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या निदर्शनास आणावी.</u>***

**गुणपडताळणी अर्ज,उ.प.छायाप्रत मिळणेचा अर्ज व पुनर्मुल्यांकन करणेसाठीचा अर्ज व शिक्षकांचा अभिप्राय नमुना फॉर्म इ. मंडळाच्या <u>www.sscboardkolhapur.in</u> या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.**

प्र. विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

प्रति,
प्राचार्य , सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये, सातारा/सांगली/कोल्हापूर.

२४/८/१८

# गुण पडताळणी / उत्तरपत्रिकेची छायाप्रत मागणी अर्ज

## माध्यमिक शालान्त व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च/जुलै-ऑगस्ट

| |
|---|
| दिनांकः---/---/२०१८ |
| गुणपडताळणी शुल्क रू. ५० प्रती विषय |
| उत्तरपत्रिका छायांकित प्रत शुल्क रू. ४००/- प्रती विषय |

| कार्यालयीन उपयोगासाठी | |
|---|---|
| अर्ज नोंदणी क्रमांक | |
| प्रकरण क्रमांक | |

प्रति,

मा.विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
--------विभागीय मंडळ, ------------

महोदय,

मी खालील सही करणार विनंती अर्ज करतो/करते की, मी फेब्रुवारी-मार्च/जुलै-ऑगस्ट २०-- च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ १० वी) / उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ १२ वी) परीक्षेस खाली नमूद केलेल्या तपशीलानुसार प्रविष्ट झालो होतो/झाले होते.

विद्यार्थ्याचे संपूर्ण नावः ----------------------------------------------------

निवासाचा पूर्ण पत्ता : ----------------------------------------------------------------

तालुकाः---------- जिल्हाः------------पिनकोडः----------- भ्रमणध्वनीः------------

| परीक्षेचा बैठक क्रमांक | महिना व वर्ष | शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व सांकेतांक क्रमांक | केंद्र क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

तरी मला सदर परीक्षेच्या खालील विषयांची १) गुणपडताळणी करून मिळावी ☐ छायांकित प्रत मिळावी ☐

| अ.क्र. | विषयाचे नाव | माध्यम | विषयाचा सांकेतांक क्रमांक | उत्तराचे माध्यम | मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |

| उत्तरपत्रिका गुणपडताळणी/छायाप्रत मिळण्यासाठी अर्ज केलेल्या एकूण विषयांची संख्या | भरलेले शुल्क | भरलेल्या शुल्काचा तपशील व दिनांक | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | डी.डी.क्र | रोख | चलन क्र. | दिनांक |
| | | | | | |

विद्यार्थ्याची स्वाक्षरी

टिपः- ज्या विद्यार्थ्याला छायांकित प्रतीसाठी अर्ज करावयाचा असेल अशा विद्यार्थ्याने त्याच विषयाच्या गुणपडताळणीसाठी वेगळा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. छायाप्रती देण्यापूर्वी त्या उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी करूनच उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत उपलब्ध करून दिली जाते. गुणपडताळणी/छायांकित प्रती याबाबतचा अटी व शर्ती या मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून दिल्यानुसार राहतील. विद्यार्थ्यास छायाप्रत मिळाल्यापासून पाच दिवसात पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करणे आवश्यक आहे. संकेत स्थळावरील गुणांची अथवा गुणपत्रिकेची किंवा प्रवेशपत्राची स्वसाक्षांकित छायाप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अर्जाचे मूल्य रु.१०/-

# उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्याबाबतचा अर्ज

## माध्यमिक शालांत /उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा

फेब्रुवारी–मार्च/जुलै–ऑगस्ट २०१

| कार्यालयीन उपयोगासाठी |
|---|
| अर्ज नोंदणी क्रमांक - |
| प्रकरण क्रमांक - |

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्च माध्य. शिक्षण मंडळ ,
कोल्हापूर विभागीय मंडळ ,कोल्हापूर.

महोदय,

मी खालील सही करणार विनंती अर्ज करते/करतो की, मी फेब्रु.-मार्च/जुलै-ऑगस्ट २० माध्यमिक शालांत/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी नमूद केलेल्या बैठक क्रमांकाने प्रविष्ठ झालो होतो/झाले होते. सदर परीक्षेच्या माझ्या खालील विषयाच्या उत्तरपत्रिका/उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्यासाठी मी प्रती विषय रु ३००/- (रु.तीनशे फक्त) प्रमाणे शुल्क भरत आहे. माझा आवश्यक तपशील खालील प्रमाणे .

| परीक्षा बैठक क्रमांक | परीक्षार्थीचे पूर्ण नांव | शाळा/क.म.साकेतांक क्रमांक | केंद्र क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

संपूर्ण पत्ता :-

तालुका:- जिल्हा :- पिन कोड नंबर

भ्रमणध्वनी (मोबाईल नंबर) -

उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करणेबाबतचा तपशील :- विषय शिक्षकांच्या अभिप्रायासह उत्तरपत्रिकेची छायाप्रत जोडली आहे. ( संकेतस्थळावरील गुणांची अथवा गुणपत्रिकेची /प्रवेशपत्राची प्रमाणित छायाप्रत(झेरॉक्स)सोबत जोडावी. )

| अ.क्र. | विषयाचे नांव | विषय कोड | उत्तराचे माध्यम | मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

| उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्यासाठी अर्जामध्ये नमूद केलेल्या विषयांची एकूण संख्या | भरलेले शुल्क | शुल्काचा तपशील | | |
|---|---|---|---|---|
| | | रोख पावती क्रमांक | बँक ऑफ इंडिया चलन क्रमांक | दिनांक |
| | | | | |

वर दिलेली माहिती खरी असून या अर्जाच्या मागे दिलेल्या अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

दिनांक :-
ठिकाण :-

विद्यार्थ्याची स्वाक्षरी

# उच्च माध्यमिक (इ.१२ वी) /माध्यमिक शालांत(इ.१० वी ) प्रमाणपत्र परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन करण्याबाबतच्या अटी व शर्ती

१) फक्त उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी करणारे विद्यार्थीच पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज करु शकतील.

२) पुनर्मुल्यांकनासाठी विद्यार्थ्याने स्वहस्ताक्षरात अर्ज करणे आवश्यक राहील.

३) यासाठी प्रती विषय रु ३००/- (रु.तीनशे फक्त)शुल्क मंडळाकडे रोखीने अथवा चलनाव्दारे जमा करावे लागेल.

४) पुनर्मुल्यांकनासाठी जास्तीत जास्त तीन विषयासाठी अर्ज करता येईल. (सहा)

५) या विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळाल्यानंतर पाच दिवसाच्या आत मंडळाकडे विहीत नमुन्यात आपल्या शाळेतील / क.महाविद्यालयातील विषय शिक्षकाकडून उत्तरपत्रिकेची छायाप्रत तपासून घेवून त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अर्ज करणे आवश्यक राहील.

६) विद्यार्थी केवळ लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मुल्यांकनासाठी मागणी करु शकतील. ऑनलाईनद्वारे दिलेली परीक्षा तसेच तोंडी ,प्रात्यक्षिक,अंतर्गत मूल्यमापन व प्रकल्पलेखन किंवा तत्सम उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्याची मागणी करता येणार नाही.तसेच विषयाच्या एका भागाचे उत्तरपत्रिकेच्या पुनर्मुल्यांकन करण्याची मागणी करता येणार नाही.

७) जे विद्यार्थी इ.१० वी व इ.१२ वी च्या परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या उत्तरपत्रिकेबाबत संपर्क केंद्रावरील / आवेदनपत्र सादर केलेल्या शाळा / क.महाविद्यालयातील विषय शिक्षकांकडून अभिप्राय घेवून अर्जासोबत सादर करावेत.

८) विद्यार्थ्यांना अर्जाचा नमुना मंडळाच्या संकेतस्थळावरुन सुध्दा उपलब्ध होवू शकेल. संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्यात येणाऱ्या अर्जाचे शुल्क (रु.१०/-) संबंधित विद्यार्थ्यास पुनर्मुल्यांकनाच्या शुल्कासोबत मंडळाकडे जमा करावे लागेल.

९) परिपूर्ण भरलेला अर्ज विद्यार्थ्यास किंवा त्याच्या प्रतिनिधीमार्फत मंडळाकडे समक्ष हस्तपोच स.१०.३० ते दु.३.०० या वेळेत सादर करावेत. कोणत्याही परिस्थितीत पोष्टाव्दारे प्राप्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. पुनर्मुल्यांकनाचे शुल्क रोख अथवा चलनाव्दारेच स्विकारले जाईल.

१०) उत्तरपत्रिकेची पुनर्मुल्यांकनाची कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात येईल.

(अ) वस्तुनिष्ठ प्रश्न ( १ किंवा अर्ध्या गुणांचे प्रश्न .उदा:- रिकाम्या जागा , जोडया लावा, योग्य पर्याय निवडा, चुक किंवा बरोबर लिहा इ. प्रकारचे प्रश्न) पुर्णपणे तपासले जावून त्यामध्ये होणारी गुणांची वाढ किंवा घट जशीच्या तशी ग्राह्य धरण्यात येईल.

(ब) इतर सर्व प्रश्न गुणात बदल होणाऱ्या उत्तराबाबतचा निर्णय समितीमध्ये बहुमताने मान्य होणे आवश्यक आहे. समान संख्येच्या मतांच्या बाबतीत मुख्य नियामक/समिती प्रमुख यांचा निर्णय अंतिम राहील. त्यामधील वाढ/घट ग्राह्य धरण्यात येवून असे बदल विहित पध्दतीने विभागीय अध्यक्षांच्या मान्यतेने सदर निर्णय अंमलात आणले जातील.

(क) या प्रमाणे संपूर्ण उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यास प्राप्त झालेले सुधारीत गुण हे त्याने त्या विषयात अशा प्रश्नांसाठी पूर्वी मिळविलेल्या गुणाच्या ( मूळ गुणांच्या) किमान ५ टक्के कमी किंवा जास्त असलतील तरच सुधारित गुण ग्राह्य धरण्यात येतील. अन्यथा निकालात कोणताही बदल न करता विद्यार्थ्यास 'नो चेंज' कळविण्यात येईल.

११) पुनर्मुल्यांकनामध्ये विद्यार्थ्याच्या गुणात बदल झाल्यास तसे संबंधित विद्यार्थ्यास व शाळा / क.महाविद्यालयास कळविण्यात येईल. त्यानुसार संबंधित विद्यार्थ्याने आपले मूळ गुणपत्रक विभागीय मंडळाकडे जमा करावे. त्यानंतरच त्यास सुधारित गुणपत्रक विभागीय मंडळाकडून विनामूल्य देण्यात येईल.

१२) गुणात बदल झालेल्या प्रकरणाबाबत फक्त पुनर्मुल्यांकनासाठी आकारलेले शुल्क परत दिले जाईल.

१३) उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन केल्यानंतर त्यावर होणारा निर्णय अंतिम राहील व तो विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील. त्यानुसार पुनर्मुल्यांकनानंतर संबंधित विद्यार्थ्याची मूळ संपादणूक आपोआप रद्द होवून सुधारित संपादणूक विद्यार्थ्यास स्विकारावी लागेल.प्राप्त झालेले गुण हे त्याने पूर्वी मिळविलेल्या गुणांच्या ( मूळ गुणांच्या) ५ टक्के पेक्षा कमी होत असतील तरच ते कमी करण्यात येतील.

१४) अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुनर्मुल्यांकनानंतर त्याच्या मूळ निकालात बदल होत नसल्यास तसेच विषयात उत्तीर्ण होत नसल्यास ५ टक्के पर्यंतचा गुण बदल प्रकरणी त्याचा मूळ निकाल कायम ठेवण्यात येवून त्यास 'नो चेंज' असे कळविले जाईल.

१५) एकदा उत्तपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन केल्यानंतर त्याच उत्तरपत्रिकेच्या पुन:श्च गुणपडताळणी , पुनर्मुल्यांकन किंवा छायांकित प्रतींची मागणी करता येणार नाही.

१६) पुनर्मुल्यांकन संदर्भातील तक्रार निवारण पध्दती ही निकालात सुधार होण्यासाठी विद्यार्थ्यास उपलब्ध करुन देण्यात आलेली अतिरिक्त सुविधा असल्यामुळे यानुसार कार्यवाही करीत असताना निकाल जाहीर होण्यास विलंब झाल्यास त्यामुळे होणाऱ्या संभाव्य परिणामास /शैक्षणिक नुकसानीस मंडळ जबाबदार असणार नाही.

१७) पुनर्मुल्यांकन केलेल्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत विद्यार्थ्यास दिली जाणार नाही किंवा माहिती अधिकारातही उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी विद्यार्थ्यास करता येणार नाही.

१८) दारिद्रय रेषेखालील विद्यार्थ्यालाही उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीसाठी व पुनर्मुल्यांकनासाठी विहित शुल्क भरावे लागेल.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
कोल्हापूर विभागीय मंडळ कोल्हापूर

उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकनाबाबतचा अभिप्राय
माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु–मार्च/ जुलै–ऑगस्ट –२०

विषय – :  दिनांक:– / /२०

मी (शिक्षकाचे पूर्ण नाव ) ----------------------------------------------------------------------------------------------------------- या शाळेत /कनिष्ठ महाविद्यालयात---------------------------------------------या पदावर कार्यरत असून इ .१० वी /इ. १२ वी ला -----------हा विषय शिकवित आहे.

अर्जदार विद्यार्थी हा आमच्या शाळेतील/क.महाविद्यालयातील असुन तो उच्च माध्यमिक/माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र फेब्रु–मार्च/ जुलै–ऑगस्ट –२० परीक्षेस प्रविष्ठ झाला होता. सदर विद्यार्थ्याने मंडळाकडून उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत घेतल्यानंतर पुनर्मुल्यांकन करण्याबाबतचा अर्ज केलेला आहे. त्यानुसार सदर विद्यार्थ्याचे उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीची मी नमुना उत्तरांच्या आधारे पुनश्च: तपासणी केलेली असून मला खालील प्रश्नात कमी गुणदान झाल्याचे आढळून येते./गुणदान योग्य झाल्याचे आढळून येते. गुणदान कमी झाल्याबाबत मी खालीलप्रमाणे सकारण अभिप्राय देत आहे. ( अभिप्राय देताना प्रश्न क्रमांक , उपप्रश्न क्रमांक स्पष्टपणे नमूद करावे.)

---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------

मुख्याध्यापक/प्राचार्य स्वाक्षरी

विषय शिक्षकाची स्वाक्षरी

शाळा/ क.महाविद्यालयाचा शिक्का

कार्यालयीन उपयोगासाठी

विद्यार्थ्याचे पूर्ण नांव :–
बैठक क्रमांक :–
पुनर्मुल्यांकनासाठीचा विषय :–

## उच्च माध्यमिक (इ.१२ वी) /माध्यमिक शालांत(इ.१० वी ) प्रमाणपत्र परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन करण्याबाबतच्या अटी व शर्ती .

१) फक्त उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी करणारे विद्यार्थीच पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज करु शकतील.

२) पुनर्मुल्यांकनासाठी विद्यार्थ्यांने स्वहस्ताक्षरात अर्ज करणे आवश्यक राहील.

३) यासाठी प्रती विषय रु ३००/- (रु.तीनशे फक्त)शुल्क मंडळाकडे रोखीने अथवा चलनाव्दारे जमा करावे लागेल.

४) पुनर्मुल्यांकनासाठी जास्तीत जास्त सहा विषयासाठी अर्ज करता येईल.

५) या विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळाल्यानंतर पाच दिवसाच्या आत मंडळाकडे विहीत नमुन्यात आपल्या शाळेतील / क.महाविद्यालयातील विषय शिक्षकाकडून उत्तरपत्रिकेची छायाप्रत तपासून घेवून त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अर्ज करणे आवश्यक राहील.

६) विद्यार्थी केवळ लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मुल्यांकनासाठी मागणी करु शकतील. तोंडी ,प्रात्यक्षिक,अंतर्गत मूल्यमापन व प्रकल्पलेखन किंवा तत्सम उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन करण्याची मागणी करता येणार नाही.तसेच विषयाच्या एका भागाचे उत्तरपत्रिकेच्या पुनर्मुल्यांकन करण्याची मागणी करता येणार नाही.

७) जे विद्यार्थी इ.१० वी व इ.१२ वी च्या परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या उत्तरपत्रिकेबाबत संपर्क केंद्रावरील / आवेदनपत्र सादर केलेल्या शाळा / क.महाविद्यालयातील विषय शिक्षकांकडून अभिप्राय घेवून अर्जासोबत सादर करावेत.

८) विद्यार्थ्यांना अर्जाचा नमुना मंडळाच्या संकेतस्थळावरुन सुध्दा उपलब्ध होवू शकेल. संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्यात येणाऱ्या अर्जाचे शुल्क (रु.१०/-) संबंधित विद्यार्थ्यास पुनर्मुल्यांकनाच्या शुल्कासोबत मंडळाकडे जमा करावे लागेल.

९) परिपूर्ण भरलेला अर्ज विद्यार्थ्यास किंवा त्याच्या प्रतिनिधीमार्फत मंडळाकडे समक्ष हस्तपोच स.१०.३० ते दु.३.०० या वेळेत सादर करावेत. कोणत्याही परिस्थितीत पोस्टाव्दारे प्राप्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. पुनर्मुल्यांकनाचे शुल्क रोख अथवा चलनाव्दारेच स्विकारले जाईल.

१०) उत्तरपत्रिकेची पुनर्मुल्यांकनाची कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात येईल.

अ) वस्तुनिष्ठ प्रश्न ( १ किंवा अर्ध्या गुणांचे प्रश्न .उदा:- रिकाम्या जागा , जोड्या लावा, योग्य पर्याय निवडा, चुक किंवा बरोबर लिहा इ. प्रकारचे प्रश्न) पुर्णपणे तपासले जावून त्यामध्ये होणारी गुणांची वाढ किंवा घट जशीच्या तशी ग्राह्य धरण्यात येईल.

ब) इतर सर्व दिर्घोत्तरी प्रश्नाच्या गुणात बदल होणाऱ्या उत्तराबाबतचा निर्णय समितीमध्ये बहुमताने मान्य होणे आवश्यक आहे. समान संख्येच्या मतांच्या बाबतीत मुख्य नियामक/समिती प्रमुख यांचा निर्णय अंतिम राहील. त्यामधील वाढ/घट ग्राह्य धरण्यात येवून असे बदल हे त्याने त्या विषयात अशा प्रश्नांसाठी पूर्वी मिळविलेल्या गुणाच्या (दिर्घोत्तरी प्रश्नाच्या मूळ गुणांच्या) किमान ५ टक्के कमी किंवा जास्त असतील तरच सुधारित गुण ग्राह्य धरण्याचा निर्णय हा विहीत पध्दतीने विभागीय अध्यक्षाच्या मान्यतेने निर्णय अमंलात आणून विद्यार्थ्यांस बदल अथवा नों चेंज कळविण्यात येईल.

११) पुनर्मुल्यांकनामध्ये विद्यार्थ्याच्या गुणात बदल झाल्यास तसे संबंधित विद्यार्थ्यास व शाळा / क.महाविद्यालयास कळविण्यात येईल. त्यानुसार संबंधित विद्यार्थ्यांने आपले मूळ गुणपत्रक विभागीय मंडळाकडे जमा करावे. त्यानंतरच त्यास सुधारित गुणपत्रक विभागीय मंडळाकडून विनामूल्य देण्यात येईल.

१२) गुणात बदल झालेल्या प्रकरणाबाबत फक्त पुनर्मुल्यांकनासाठी आकारलेले शुल्क परत दिले जाईल.

१३) उत्तरपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन केल्यानंतर त्यावर होणारा निर्णय अंतिम राहील व तो विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील. त्यानुसार पुनर्मुल्यांकनानंतर संबंधित विद्यार्थ्याची मूळ संपादणूक आपोआप रद्द होवून सुधारित संपादणूक विद्यार्थ्यास स्विकारावी लागेल.

१४) अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुनर्मुल्यांकनानंतर त्याच्या मूळ निकालात बदल होत नसल्यास तसेच विषयात उत्तीर्ण होत नसल्यास ५ टक्के पर्यतचा गुण बदल प्रकरणी त्याचा मूळ निकाल कायम ठेवण्यात येवून त्यास 'नो चेंज' असे कळविले जाईल.

१५) एकदा उत्तपत्रिकेचे पुनर्मुल्यांकन केल्यानंतर त्याच उत्तरपत्रिकेच्या पुन:श्च गुणपडताळणी , पुनर्मुल्यांकन किंवा छायांकित प्रतींची मागणी करता येणार नाही.

१६) पुनर्मुल्यांकन संदर्भातील तक्रार निवारण पध्दती ही निकालात सुधार होण्यासाठी विद्यार्थ्यास उपलब्ध करुन देण्यात आलेली अतिरिक्त सुविधा असल्यामुळे यानुसार कार्यवाही करीत असताना निकाल जाहीर होण्यास विलंब झाल्यास त्यामुळे होणाऱ्या संभाव्य परिणामास /शैक्षणिक नुकसानीस मंडळ जबाबदार असणार नाही.

१७) पुनर्मुल्यांकन केलेल्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत विद्यार्थ्यास दिली जाणार नाही किंवा माहिती अधिकारतही उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी विद्यार्थ्यास करता येणार नाही.

१८) उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळण्यासाठी विद्यार्थ्यांने भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

# फोटोकॉपी,पुनर्मुल्यांकन व गुणपडताळणी करणेबाबतची कार्यपध्दती.

***********

## ४) उत्तरपत्रिकेची छायाप्रत मागणीबाबत. [ Photocopy ]

ऑनलाईल निकाल लागल्यापासून विद्यार्थी थेट मंडळाकडे फोटोकॉपीसाठी अर्ज करु शकतो.विहितअर्ज भरुन त्यासोबत इंटरनेटवरील गुणपत्रिकेची छायाप्रत व हॉलतिकीटची छायाप्रत जोडावी. प्रत्येक विषयासाठी रु.४००/-प्रमाणे फी भरावी.

**मुदत ऑनलाईन निकालापासून २० दिवस**

फोटोकॉपी मिळण्याचा अंदाजित कालावधी १० ते १५ दिवसाचा राहील .फोटोकॉपी तयार झाल्यानंतर उ.प. छायाप्रती घेवून जाण्यासाठी मंडळाकडून दूरध्वनी येईल. फोटोकॉपी मिळाल्यानंतर सदरची उत्तरपत्रिका कॉलेजमधील विषय शिक्षकांच्याकडून तपासून घेण्यात यावी. विहित नमुन्यातील फॉर्मवर त्यांचा अभिप्राय प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह घेण्यात यावा.

## ५) पुनर्मुल्यांकन [ Revaluation]

पुनर्मुल्यांकन करावयाचे असल्यास सदरची उत्तरपत्रिका, विषय शिक्षकांचा अभिप्राय व पुनर्मुल्यांकन करण्याबाबतचा विहित अर्जासह छायाप्रत दिल्यापासून पाच दिवसाच्या आत मंडळ कार्यालयात येऊन रु.३१०/- प्रती विषया प्रमाणे पुनर्मुल्यांकनासाठी शुल्क भरावे. तदनंतर पुनर्मुल्यांकनाची कार्यवाही मंडळाकडून केली जाईल. सदरचा कालावधीही अंदाजे १० ते १५ दिवसांचा राहील.पुनर्मुल्यांकनामध्ये बदल झाल्यास अथवा न झाल्यास तसे मंडळाकडून कळविण्यात येईल. फक्त लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचेच पुनर्मुल्यांकनाची मागणी करु शकेल. **प्रात्य./तोंडी/अंतर्गत** मूल्यमापन गुणांची पुनर्मुल्यांकनाची मागणी करता येणार नाही. तसेच **सहा** विषयापर्यंत पुनर्मुल्यांकनाठी अर्ज करु शकतो. मात्र माहिती तंत्रज्ञान (IT ) या विषयाच्या उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन करता येणार नाही.

## ६) गुणपडताळणी :- (Verification)

गुणांची पडताळणी करावयाची असल्यास मंडळाकडून ऑनलाईल निकाल लागल्यापासून विहित नमुन्यातील अर्ज त्या सोबत ऑनलाईलन निकालाची प्रत जोडून प्रती विषय रु ५०/- प्रमाणे चलनाव्दारे कॉलेजमध्ये अर्ज सादर करु शकता किंवा मंडळात रोखीने रक्कम भ रु न अर्ज सादर करु शकता. सदरची मुदत ऑनलाईन निकाल जाहीर झाल्यापासून १० दिवसांची असते. याबाबत गुण पडताळणीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी व कॉलेजला लेखी कळविले जाते.

फोटोकॉपी,पुनर्मुल्यांकन व गुणपडताळणी इत्यादीचे विहित फॉर्म मंडळाच्या वेबसाईटवर सुध्दा उपलब्ध आहेत.

**मंडळाची वेबसाईट :-**

**www.sscboardkolhapur.in**

**********************

# * महत्वाच्या अटी/शर्ती व सुचना *

०१) विद्यार्थ्यांला फक्त त्याच्या स्वतःच्याच उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीची मागणी संबंधित विभागीय मंडळाकडे करता येईल. यासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे विहित पध्दतीने अर्ज करणेआवश्यक राहील.

०२) ऑनलाईन निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून कमाल २० दिवसापर्यंत विद्यार्थ्याने मंडळाकडे विहित नमुन्यात अर्ज करावा. तद्नंतरच्या दिनांकाचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

०३) विहित अर्जातील माहिती पूर्णपणे भरलेली असावी.

०४) उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी प्रतिविषय रु.४००/- इतके शुल्क आकारण्यात येईल.

०५) उत्तरपत्रिका छायाप्रती मागणीबाबतचा अर्ज व शुल्क (रोख किंवा मंडळाच्या चलनाद्वारे ) थेट मंडळामध्ये अथवा पोस्टाने स्विकारण्यात येईल. अर्जा सोबत ऑनलाईन निकालाची अथव गुणपत्रिकेची झेरॉक्स जोडणे अनिवार्य आहे.

०६) उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी अर्ज केला असल्यास त्या विषयांच्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी करण्यात येणार असल्याने गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही.

०७) अर्जदारास छायाप्रत मिळण्याचा संभाव्य कालावधी त्याला भ्रमणध्वनी(मोबाईल)द्वारे कळविण्यात येईल.

०८) मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत विद्यार्थ्यांना अर्जात नमुद केल्याप्रमाणे रजिस्टर पोस्टाने किंवा हस्तपोच देण्यात येईल.

०९) समक्ष छायाप्रत नेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र/फोटोसह असलेले ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील. यासाठी प्रवेशपत्र अगर कोणतेही फोटोसह ओळखपत्र मान्य करण्यात येईल.

१०) उत्तरपत्रिका छायाप्रत हस्तपोच घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी तशी पोहोच देणे बंधनकारक राहील.

११) एकदा उत्तरपत्रिकेची छायाप्रत दिल्यावर त्याच्याशी संबंधित कोणतीही माहिती, माहिती अधिकाराखाली दिली जाणार नाही.

१२) परीक्षक/नियामक इ. ची माहिती, माहिती अधिकाराखाली देण्यात येणार नाही.

१३) परिक्षेत गैर मार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्याची चौकशी झाली असल्याने त्याला माहिती अधिकाराखाली त्याच्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत देण्यात येणार नाही.

१४) उत्तरपत्रिकांची छायाप्रत देण्यात येणार असल्याने मूळ उत्तरपत्रिका दाखविली जाणार नाही.

१५) संबंधित विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकांची छायाप्रत अन्य कोणालाही देवू नये तसेच तिला प्रसिध्दी माध्यमाद्वारे प्रसिध्दी देण्यात येवू नये, दिल्यास कारवाईस पात्र राहील.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ ,कोल्हापूर.

फोटोकॉपी, पुनर्मुल्यांकन व गुणपडताळणी मुदत व आवश्यक कागदपत्रे तपशील

* उच्च माध्यमिक ( इ.१२ वी) *

| अ.क्र. | तपशील | मुदत | शुल्क | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १. | उत्तरपत्रिका फोटोकॉपी | २७ ऑगस्ट २०१८ ते १५ सप्टेंबर २०१८ | प्रती विषय रु.४००/- | विहित अर्ज ,नेट वरील गुणपत्रिकेची छायाप्रत |
| २. | उत्तरपत्रिका पुनर्मुल्यांकन | उ.प.छायाप्रत दिल्यानंतर पाच दिवसाच्या आत अर्ज करणे बंधनकारक | प्रती विषय रु.३००/- + अर्ज शुल्क रु.१०/- | विहित अर्ज ,तपासलेली उत्तरपत्रिकेची छायाप्रत, शिक्षकांचा अभिप्राय प्राचार्यांची सही व शिक्का. |
| ३. | उत्तरपत्रिका गुणपडताळणी | २७ ऑगस्ट २०१८ ते ०५ सप्टेंबर २०१८ | प्रती विषय रु.५०/- | विहित अर्ज, ऑनलाईन निकाल प्रत अथवा मूळ गुणपत्रिकेची छायाप्रत |